माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००२८६३**

**अपिलार्थी श्री. विनोद कनाकीया**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त**
आर्थिक गुन्हे विभाग, पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालयीन आवार
नवीन इमारत, तिसरा माळा, मुंबई-४०० ००१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त**
आर्थिक गुन्हे विभाग, पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालयीन आवार
नवीन इमारत, तिसरा माळा, मुंबई-४०० ००१

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०४.०३.२०२६**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २७.०४.२०२४ | १५.०५.२०२४ | २७.०५.२०२४ | ०१.०७.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २४.०७.२०२४ रोजीच्या अर्जान्वये समाधान झालेले नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १५.०५.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ०१.०७.२०२४ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. २७.०४.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:-

*(1) What type of action has been tekan against all this after my compalaint submitted at EOW Crime, for a trappd police me from last 13 years and near about 1 months in a financial matter as per given in my compalaint and mail id*

*(2) Information and a clerification from Eow crime police in a righting after long time and one reply given that was not a real reply so complaint given at top level DE for a matter no 1 Urja Construction, Dhaval Shah, Vipul Shah, Madan Shah and Other party and a totally sappratt party Kamlesh Sheth, Kajal K Sheth and Others as per given in my compalaint with Advocate Dipesh Sanchaca letters.*

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. १५.०५.२०२४ रोजी अपिलार्थींना मुद्दा क्र. (१) बाबत कळविले की, (१) अर्जदार यांचे मुळ अर्ज/कागदपत्रे ही योग्य त्या कार्यवाहीकरीता विलेपार्ले पोलीस ठाणे, मुंबई येथे

..२/-

पाठविण्यात, आलेली आहेत. (२) अर्जदार यांचा आ.क्र. ३१०८, दि. १६.०३.२०२४ व आ.क्र. ६३७२, दि.१२.०४.२०२४ रोजी अन्वये केलेले अर्ज दफ्तरी दाखल करण्यात आले आहेत. सदरबाबत अर्जदार यांना जा.क्र. ७०९/२४ व ७१०/२४, वपोनि/हौसिग-१, दि. ०८.०५.२०२४ रोजी अन्वये पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे.

मुद्दा क्र. (२) बाबत कळविले की, (१) अर्जदार यांचे मुळ अर्ज / कागदपत्रे ही योग्य त्या कार्यवाहीकरीता विलेपार्ले पोलीस ठाणे, मुंबई येथे पाठविण्यात आलेली आहेत. (२ अर्जदार यांचा आ.क्र. ३१०८, दि.१६.०३.२०२४ व आ.क्र. ६३७२, दि. १२.०४.२०२४ रोजी अन्वये केलेले अर्ज दफ्तरी दाखल करण्यात आले आहेत. सदरबाबत अर्जदार यांना जा.क्र. ७०९/२४ व ७१०/२४, वपोनि/हौसिग-१, दि.०८.०५.२०२४ रोजी अन्वये पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे.

४. अपिलार्थीचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. २७.०५.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०१.०७.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना दिलेली माहिती योग्य आहे असे नमुद करुन प्रथम अपील अमान्य करुन निकाली काढलेले आहे.

५. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन देताना नमुद केले आहे की, त्यांनी केलेली तक्रार दिवाणी स्वरुपात होती म्हणून चौकशीअंती तक्रार दफ्तरी दाखल केली आहे. परंतु त्यांच्यामते सदर तक्रार दिवाणी स्वरुपाची नसुन क्रिमीनल स्वरुपाची आहे म्हणून त्यांनी दिलेली तक्रारीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सदर विषय माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कक्षेत नाही

६. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, अपिलार्थीनी वेळोवेळी याच विषयावर तक्रार करतात व आर्थिक गुन्हे विभागाकडे सर्व अर्ज पुढील कार्यवाहीकरीता विलेपार्ले पोलीस ठाणे, मुंबई येथे वर्ग करण्यात आले व विलेपार्ले पोलीस ठाणे, मुंबई यांनी संबंधीताकडे चौकशी केली असता अपिलार्थी यांची तक्रार दिवाणी स्वरुपाची असल्याने अपिलार्थी यांची तक्रार दफ्तरी दाखल केल्याबाबत कळविले आहे.

७. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०५.०३.२०२६**